महाराष्ट्र शासन

क्र.संकिर्ण-२०२५/(प्र.क्र.२९/२५)जसं(आस्था)
ई मेल : dowrestt.wrd@maharashtra.gov.in
दूरध्वनी क्र. ०२२-२२७९७०७२

जलसंपदा विभाग,
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय,मुंबई- ३२.
दिनांक : ०४.०९.२०२५.

प्रति,

सचिव,
महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण,
वर्ल्ड ट्रेड सेंटर, ९ वा मजला,
मुंबई.

विषय :- अध्यक्ष, मजनिप्रा या पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्याबाबत.

मजनिप्रा, मुंबई येथील अध्यक्ष पदावर डॉ.संजय चहांदे यांची नियुक्ती दिनांक १५.१२.२०२२ रोजीच्या अधिसूचनेन्वये करण्यात आली होती. डॉ.संजय चहांदे यांनी उक्त पदाचा राजीनामा दिल्याने सदर पद रिक्त झाले आहे.

२. सद्यस्थितीत मजनिप्राकडे विभागाचे अनेक प्रकल्प मंजूरीसाठी कार्यवाहीत आहेत. मजनिप्राच्या ४ सदस्यांपैकी सदस्य (विधी) वगळता अन्य सदस्य नियुक्त आहेत. त्यापैकी श्रीमती श्वेताली अभिजीत ठाकरे यांची सदस्य (अर्थशास्त्र) या पदावर दि.०९.०९.२०२४ रोजीच्या अधिसूचनेन्वये पुनर्नियुक्ती करण्यात आली आहे.

३. सदर बाबीचा विचार करता, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ कलम २३ मधील तरतुदीनुसार अध्यक्ष, मजनिप्रा या पदाचा अतिरिक्त कार्यभार श्रीमती श्वेताली अभिजीत ठाकरे, सदस्य (अर्थशास्त्र) यांना पुढील आदेशापर्यंत देण्यात येत आहे.

(सविता चं.बोधेकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:- जस(आस्था) कार्यासन, संग्रहार्थ.

E:\प्रक्र.२९.docx